सन २०१८-१९ च्या टंचाई कालावधीसाठी परभणी महानगरपालिकेला टंचाई निवारणार्थ करावयाच्या उपाययोजनांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१९/प्र.क्र. ५० /पापु १४

जी. टी. रुग्णालय संकुल, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक : १५ जुलै, २०१९

<u>वाचा</u> :-

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः टंचाई २००८/प्र.क्र. १४९/पापु १४, दिनांक २१.८.२००९
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः टंचाई २०१२/प्र.क्र.५३/पापु १४, दिनांक ३०.०४.२०१२
३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे क्रमांक २०१९/ नपप्र/योजना /कावि-८१, दिनांक ०८.०३.२०१९ चे पत्र व प्रस्ताव
४) आयुक्त, परभणी महानगरपालिका यांचे क्रमांक कावि/मनपा/श.अ./पा.पु/१९९/२०१८, दिनांक १६.१०.२०१८ चे पत्र व प्रस्ताव.
५) शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक एससीवाय-२०१८/प्र.क्र. २५१/म-७, दिनांक १६.०५.२०१९ (बैठकीचे इतिवृत्त)

<u>प्रस्तावना -</u>

विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी सन २०१८-१९ च्या टंचाई कालावधीसाठी परभणी शहरासाठी टंचाई निवारणार्थ टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे या उपाययोजनेसाठीच्या कामाच्या रुपये २७२.९७ लाख इतक्या किंमतीच्या प्रस्ताव प्रशासकीय मंजूरी मिळण्यासाठी शासनास सादर केला होता. टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे या उपाययोजनेसाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव नागरी तथा ग्रामीण क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तातडीच्या पाणीपुरवठा योजनांना/उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखालील

स्थायी समितीच्या दिनांक ०९.०५.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला होता. तथापि, शासन निर्णय दिनांक २१.०८.२००९ नुसार महानगरपालिका, "अ" व "ब" वर्ग नगरपरिषदेस टँकर वरील खर्च टंचाई निवारण कार्यक्रमातून अनुज्ञेय नसल्याने, मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उप समितीने निर्देश दिल्यानुसार सदर प्रस्तावास टंचाई अंतर्गत निधीमधून मान्यता देण्यासाठी एक विशेष बाब म्हणून मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यानुसार सदर प्रस्तावीत एकूण खर्चाच्या ५० % खर्च देण्यास मा. मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने परभणी महानगरपालिकेने परभणी शहरासाठी टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे या उपाययोजनेसाठी मागणी रु. २७२.९७ लाख इतक्या रक्कमेपैकी ५० % रक्कम म्हणून रु. १३६.४८ लाख इतक्या रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त झालेल्या परभणी शहरासाठी टंचाई निवारणार्थ करावयाच्या उपाययोजनांतर्गत शहरातील टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी रु. १३६.४८ लाख (अक्षरी एक कोटी छत्तीस लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त) किंमतीच्या प्रस्तावास प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यामुळे या आदेशान्वये सदर प्रस्तावास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हाधिकारी, परभणी यांनी परभणी शहरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्व प्रथम घोषित करावे.

२) परभणी महानगरपालिके क्षेत्रात टंचाई अंतर्गत उपाययोजना घेण्यात येत असल्याने उपाययोजना खर्चाच्या १० % रक्कम लोक वर्गणी म्हणून भरणा करणे आवश्यक आहे.

३) प्रस्तुत मान्य झालेल्या एकूण किंमत रु. १३६.४८ लाख खर्चाच्या ९० % म्हणजे रुपये १२२.८४ लाख इतके अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाईल. उर्वरित रक्कम म्हणजेच एकूण खर्चाच्या १० % रुपये १३.६४ लाख एवढी रक्कम लोकवर्गणी म्हणून परभणी महानगरपालिकेने यांनी भरावयाची आहे.

४) टँकरद्वारे/पिण्याच्या पाणी पुरवठा करण्यासाठीची देयके अदा करताना टँकरवर जी.पी.एस.प्रणाली बसविलेली असणे आवश्यक आहे. जी.पी.एस.प्रणालीवर ज्या टँकरच्या फेऱ्यांची नोंद होईल त्याच फेऱ्या देयकाकरिता अनुज्ञेय राहतील. ज्या पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर जी.पी.एस.प्रणाली किंवा जी.पी.एस.प्रणाली बंद असल्याकारणाने टँकर वाहतूक धारकाने टँकरच्या फेऱ्या झाल्याचा दावा केला असल्यास अशा फेऱ्या बनावट ठरतील. तसेच जी.पी.एस. प्रणालीची नोंद होत नाही म्हणून देयके प्रमाणित करण्यात येऊ नये व अशा प्रकारे प्रमाणित केलेली देयके अदा करण्यात येऊ नये.

५) संदर्भ क्र. २ मध्ये नमूद शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या दरापेक्षा खाजगी टँकर्सचे दर जास्त असू नयेत.

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१- अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याच्या आकस्मिक निकडीच्या पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, मा. मुख्यमंत्री महोदयांनी तातडीची एकवेळची बाब म्हणून दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१५१११२४०७१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA BHASKAR KUMATGI

Digitally signed by RAJENDRA BHASKAR KUMATGI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e461003bf3672f18f9dbab1603da, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=48c4e0a537923a17a2d48380c158034caa0569bf9dce61f86ab5a8724cddfebe, ou=WATER SUPPLY AND SAINITAION, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJENDRA BHASKAR KUMATGI
Date: 2019.07.15 15:03:25 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
३. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
९. विभागीय आयुक्त, औरंगाबाद
१०.जिल्हाधिकारी, परभणी
११. आयुक्त, परभणी शहर महानगरपालिका, परभणी
१२. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
१३. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
१४.मा.अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१५.सह सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१६.पापु १४ (निवडनस्ती)